# अंधाराचे दिवस येताहेत

अंधाराचे दिवस येताहेत
दिवा, दिवा जमवायला हवा ।
वेळ पडली तर सूर्य देखील
पणतीत आणून ठेवायला हवा ॥१॥

दृष्टी माणसाची बदलत चाललीय
अंधारच त्याला प्रकाश वाटतोय ।
इतका सरावलाय काळोखाला
सूर्य, चंद्र विकू बघतोय ।।२॥

काय सांगावं करीलही असं -
म्हणून सावध राहायला हवं ।
लुकलुकणाऱ्या ताऱ्यांना, फुंकर घालून
सूर्यासारखं पेटवायला हवं ॥३॥

दिवस अंधाराचे येताहेत
माणसानं माणसाला जागवायला हवं ।
संवेदन - तेजाच्या आसवांमधून
निर्व्याज नेत्रांना उजळायला हवं ॥४॥

– जयंतकुमार त्रिभुवन
('साहेर छाया' या काव्यसंग्रहातून)